रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

## वार्षिक अहवाल सन २०१९-२०

वारः शनिवार दि.१५/०२/२०२०

आजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे मा.नितीन बानुगडे (पाटील), कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.जे.के. (बापू) जाधव, सदस्य, महाविद्यालय विकास समिती तसेच आजच्या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित राहीलेले मा. महेंद्र (आप्पा लाड) व मा.डॉ.डी.डी.माने, सदस्य, महाविद्यालय विकास समिती व व्यासपीठावरील सर्व मान्यवर, माझे सर्व सहकारी व विद्यार्थी बंधू भगीनींनो, या महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचा कार्याध्यक्ष या नात्याने या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

मानव भक्तीचे उपासक, महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, सदगुरू गाडगे महाराज यांच्या कार्याची प्रेरणा आणि रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या क्रांतिदर्शी अभिनव कार्यकर्तृत्वाचा वारसा घेवून वाटचाल करणारे रयतेचे एक ज्ञानसंकुल म्हणजे आमच महाविद्यालय दि.०३ नोव्हेंबर १९५८ मध्ये शंकरराव किर्लोस्करांच्या निरोप समारंभ प्रसंगी अण्णांनी म्हटले होते की, ''या परिसरात किर्लोस्करांचा हा प्रचंड कारखाना जसा उभा राहीला आहे त्याप्रमाणे या परिसरात शिक्षणाचे महान केंद्र उभारले पाहिजे''. कर्मवीरांची ही पहाडी गर्जना म्हणजे त्यांच्या दूरदृष्टीचा साक्षात्कारच होता. या सिंहगर्जनेची परिपूर्ती कर्मवीरांच्या पदस्पर्शाने पूजित झालेल्या या भूमीमध्ये त्यांच्या अनुयायांनी जिद्दीने १५ जून १९६८ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून या महाविद्यालयाची स्थापना केली. मार्च २०१९ मध्ये हे महाविद्यालय नॅकच्या थर्ड सायकल पुनर्मुल्यांकनास सामोरे गेले त्यात महाविद्यालयास नॅक बेंगलोर यांचेकडून सी.जी.पी.ए. ३.०२ गुण मिळवून "ए" मानांकन प्राप्त झाले. ग्रामपंचायत हद्दीतील व या पंचक्रोशीतील नॅकतर्फे 'ए' ग्रेडचे मानांकन मिळवणारे हे एकमेव कॉलेज आहे. त्याचबरोबर २०१८.१९ या शैक्षणिक वर्षासाठी आदर्श महाविद्यालय कर्मवीर पारितोषिक प्राप्त झालेला आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. मा.ना.डॉ.कै.पतंगरावजी कदम साहेबांचे आशिर्वाद, मा.एन.डी.पाटील साहेबांची प्रेरणा व रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा.डॉ. अनिल पाटील साहेब यांचे प्रोत्साहन आणि पाठबळामुळे महाविद्यालय प्रगतीच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करीत आहे. संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक विकास समिती यांच्या सहकार्याने या महाविद्यालयाचा विकास सुरु आहे.

महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखामार्फत ११ वी ते पदवीपर्यंत आणि इतिहास/ रसायनशास्त्र/ इंग्रजी विषयात पदव्यूत्तर पर्यंतच्या शिक्षणाची सोय असून केंद्र शासन पुरस्कृत +२ स्तरावर व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स, मेडिकल लॅब, टेक्निशियन व बॅंकिंग कोर्सची सोय आहे. यु.जी.सी. अनुदानातून फुड प्रोसेसिंग हा करियर ओरिएटेड कोर्स असून बी.सी.ए. हा पदवी अभ्यासक्रमही सुरू आहे. प्रौढ व निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठाचे शॉर्ट टर्म कोर्सही सुरू आहेत. महाविद्यालयात एकूण ११०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ग्रंथालयाचे संगणिकीकरण झाले असून बॅंकेची सोय, मुक्तदवार पदधतीची देवाण-घेवाण इत्यादी सुविधा आहेत. ग्रंथालयातील अधिकाधिक पुस्तकांचे वाचन करणा-या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट ग्रंथवाचक' पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. १९७५ साली ज्युनिअर कॉलेज विभाग व १९९० पासून एम.सी.व्ही.सी. विभाग या महाविद्यालयात सुरू झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०१९.२०२० मध्ये ५७० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विज्ञान व वाणिज्य विभागाचा सलग ३वर्षे १०० टक्के निकाल आहेत. दक्षिण विभागात महाविद्यालयाचा प्रथम क्रमांक आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीही महाविद्यालय सतत दक्ष व प्रयत्नशील आहे. इयत्ता १२वी सायन्ससाठी सीईटी चे स्वतंत्र क्लास, चर्चेसाठी राखीव वेळ, बाहेरील तज्ज्ञ शिक्षकांची व्याख्याने,

विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकडे लक्ष, व्यक्तीगत मार्गदर्शन, पालक मेळाव्यांचे आयोजन या माध्यमातून गुणवत्ता वाढीसाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. दरवर्षीप्रमाणे महाविद्यालयाने बोर्ड व विद्यापीठ परीक्षेत उत्कृष्ठ निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

एन.सी.सी., राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक मंडळ, वाङ मय मंडळ, वाणिज्य मंडळ, विज्ञान मंडळ, विवेक वाहिनी, मुला-मुलीसाठी जिमखान्यात स्वतंत्र जिम, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, विद्यार्थी कल्याण मंडळ, कमवा व शिका योजना, बॅकवर्ड क्लास सेल, इंग्लिश स्पिकींग कोर्स, करिअर ओरिएंटेड कोर्स, रेमिडिएल टिचींग, कर्मवीर विद्याप्रबोधिनी अशा विविध उपक्रमाव्दारे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास व त्याव्दारे करिअर घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न महाविद्यालयात केला जातो. विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापकांच्या गुणवत्ता वाढीसही महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे. यासाठी स्वतंत्र संशोधन समिती महाविद्यालयात कार्यरत असून, बी.सी.यू.डी. व यु.जी.सी. कडून संशोधन प्रकल्प घेण्यासाठी तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये रिसर्च पेपर प्रकाशित व्हावेत यासाठी ही समिती प्राध्यापकांना मार्गदर्शन करते. मला सांगताना विशेष आनंद होतो की, आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक मृणालिनी आहेर मॅडम यांनी इंग्रजी विभागातील Ph.D. ही पदवी प्राप्त केली आहे. राज्यशास्त्र विभागातील प्राध्यपिका शितल पाटील यांनी Ph.D. पदवी व नेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. रसायनशास्त्र विभागातील प्रा.पिस्ते पी.बी. यांची प्रोफेसरपदी निवड झाली आहे. ही या महाविद्यालयाची उल्लेखनीय बाब आहे. म्हणून मी म्हणतो की, महाविद्यालयामधील इतर जबाबदा-या सांभाळत हया प्राध्यापकांनी शैक्षणिक क्षेत्रातील आपली घोडदौड चालू ठेवली आहे म्हणजेच प्रत्येक व्यक्ति हा आजन्म विद्यार्थीच असतो हा प्रत्यय येथे येतो. म्हणूनच या पंचक्रोशीतील हे एकमेव "A" ग्रेडचे महाविद्यालय आहे. यात काही शंका नाही.

एन.सी.सी. विभागामार्फत १ ते ११ जुलै, २०१९ रोजी प्लॅस्टिक मुक्ती अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना प्लॅस्टिक मुक्तीबाबत शपथ व रॅलीचे आयोजन करण्यात आले. स्वर्गीय आमदार डॉ.पतंगराव कदम साहेब यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीराचे उद्घाटन मा.महेंद्र (आप्पा) लाड व रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागाचे अध्यक्ष मा.माधवराव (दादा) मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत २५० स्वंयसेवकांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे पुणदी तर्फ वाळवा येथे दि.२६/०८/२०१९ ते ०१/०९/२०१९ या कालावधीत संपन्न झाले. या वर्षी झ ालेल्या अतिवृष्टीमुळे जी नैसर्गिक आपत्ती आली त्यामध्ये बुर्ली, दुधोंडी व पुणदी या गावात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वंयस्फूर्तीने पुरग्रस्त भागात स्वच्छता मोहीम राबवली. तसेच वर्षभरात नियमित कार्यक्रम चालूच असतात. त्यामध्ये जागतिक महिला दिन, योगा दिन, कारगील विजय दिन, वृक्षारोपण, कर्मवीर जयंती, एन.एस.एस. दिवस यासारखे उपक्रम राबवले जातात. व्यक्तीमत्व विकास करिता बौध्दिक व्याख्याने आयोजित केले जातात. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित दि. १६ /०१/२०२० ते २२/०१/२०२० मध्ये९ मुले व दि.०१/०२/२०२० ते ०७/०२/२०२० या शिबीरात १४ विद्यार्थी-विद्यार्थीनीनी सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाच्या कला विभागात यावर्षी मराठी विभागाने भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त, वि.स.खांडेकर जयंतीनिमित्त, "लेखक आपल्या भेटीला" या कार्यक्रमाअंतर्गत प्रा.विठठल सदामते यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. हिंदी विभागाच्या वतीने हिंदी भाषेचा प्रसार, प्रचार करण्याच्या निमित्ताने व हिंदी भाषेकडे विद्यार्थ्यांचे आकर्षण वाढावे यासाठी हिंदी निबंध, वक्तृत्व, गीतगायन, काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी इंग्रजी विभागाने निरनिराळे उपक्रम राबवले त्यातील सर्वात महत्वाचा उपक्रम म्हणजे "जोडीदाराची विवेकी निवड संवादशाळा" हा आहे. यावर्षी अर्थशास्त्र विभागाने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि.२४ जानेवारी, २०२० मध्ये केले होते. यावर्षी राज्यशास्त्र विभागाने ७ विद्यार्थी व १ प्राध्यापक नागपूर अधिवेशन अभ्यास सहलीला पाठविले. या कार्यक्रमाचा हेतू असा होता की, विधमंडळाचे प्रत्यक्ष कामकाज कसे चालते हे पाहता यावे. इतिहास विभागाने दरवर्षी प्रमाणे यावर्षीदेखील क्रांतिदिन साजरा केला आहे. कारण हा सर्व परिसर क्रांतिवीरांचा आहे. भूगोल विभागाने खालील उपक्रम साजरे केले आहेत. ते खालीलप्रमाणे - ओझोन दिन, युवा ऊर्जा मेळावा, भूगोल दिन, पुरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत हे आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कॉमर्स विभागातर्फे पुढील कार्यक्रम घेण्यात आले. कॉमर्समधील करिअर संधी या विषयी डॉ.ए.एम.गुरव यांची एक दिवसीय कार्यशाळा. बी.कॉम.भाग-२ सेमिस्टर -३ मध्ये विद्यार्थ्यानी अक्षता ठिक हिने व्यावसायिक संख्याशास्त्र या विषयात ५० पैकी ५० गुण संपादन केले. याबद्दल हिचे विशेष अभिनंदन.

यावर्षी सायन्स विभागात प्राणीशास्त्र विभागाने एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे दि.१७/०१/२०२० रोजी आयोजन केले होते. वनस्पतीशास्त्र विभागाने यावर्षी मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने पाककलचे आयोजन केले. ढोकळा, पॅटिस, चॉकलेट केक, सामोसे हे पदार्थ तयार केले होते. रसायनशास्त्र विभागाने विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून मुलांचे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. हा एक नाविण्यपूर्ण उपक्रम आहे. यावर्षी संख्याशास्त्र विभागाने विद्यार्थ्यासाठी सेमिनार आणि पीपीटी प्रेझेन्टेशन हा नवीन उपक्रम सुरू केला आहे. गणित विभागाने यावर्षी रामानुजन क्वीज Competition या स्पर्धेचे आयोजन केले होते. मला सांगण्यास अतिशय आनंद होत आहे की, या वर्षी बी.एस्सी.भाग-३ गणित विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे. दोन मुलांना ९० टक्के च्या वर आणि ८ मुलांना ८० टक्के गुण प्राप्त झाले आहेत. याचे सर्व श्रेय त्या विभागाचे विभागप्रमुख प्रा.बी.ए. पाटील व त्यांचे सहकारी यांना जाते. याबद्दल विभाग प्रमुख यांचे विशेष अभिनंदन.

यावर्षी भौत्तिकशास्त्र विभागाने प्राध्यापकांसाठी ट्रेनिंग वर्कशॉप हा अभ्यासक्रमातील बदल झाल्याने आयोजित केला होता. मला सांगण्यास अतिशय आनंद होत आहे की, शिवाजी विद्यापीठ आयोजित अविष्कार स्पर्धेमध्ये श्री.सागर शामराव कदम बी.एस्सी.भाग-१ हा विद्यार्थी इंजिनिअरींग टेक्नॉलॉजी या विभागात प्रथम व श्री.सत्यम तिरमारे बी.एस्सी.भाग-३ हा प्युअर सायन्स या विभागात तिसरा आला. तसेच श्री.सागर शामराव कदम याला रयत इन्स्पायर Competition स्पर्धेमध्ये उत्तजनार्थ पारितोषिक मिळाले आहे. याबद्दल या

विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन. या शैक्षणिक वर्षात बी.सी.ए. च्या विद्यार्थ्यांनी स्वयं:सिध्दा कार्यक्रमामध्ये बारामती येथे सहभाग नोंदविला आहे.

आपल्या महाविद्यालयाचे ग्रामीण भागातील एकमेव संगणीकीकृत ग्रंथालय आहे. नॅक पिअर टिमने उत्कृष्ट ग्रामीण भागातील ग्रंथालय असे रिपोर्टमध्ये नमुद केले आहे. A ग्रेड मिळविण्यामध्ये ग्रंथालयाचा सिंहाचा वाटा आहे. मोफत इंटरनेट सुविधा पुस्तकांची देवाण-घेवाण, सॉफ्टवेअरव्दारे ऑनलाईन पध्दतीने केली जाते. बुक-बँक योजना आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राबवली जाते. ब्रेल-बुक सुविधा उपलब्ध आहे. चालू शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवले गेले. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या मध्यवर्ती युवा महोत्वामध्ये मुकनाटय, लोकनृत्य या कलाप्रकारांसह वक्तृत्व स्पर्धमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती यांच्या वतीने आयेजित स्वयंसिध्दा युवती संमेलनामध्ये मी युथ आयकॉन सादरीकरण महाविद्यालयातील कु. नम्रता चौगुले हिला उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त.

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मा.प्राचार्य यांच्या आव्हानास प्रतिसाद देऊन, सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून पुरग्रस्त काळामध्ये प्रत्येकी रूपये २५००/- याप्रमाणे ८५,०००/- रूपये गोळा केले व त्याचे शालेय साहित्य खरेदी करून पुरग्रस्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४ वहया व १ पेनचे वाटप केले. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची पदवीपर्यंत सोय व्हावी याकरिता या वर्षी गणित व संख्याशास्त्र व पदव्युत्तर विभागात Analytical Chemistry विनाअनुदानित तत्वावर मा.प्राचार्यांनी सुरू केले आहेत. याचा फायदा या पंचक्रोशीतील मुलींना होत आहे. व हे कोर्स चालू करण्यासाठी मा.प्राचार्य व स्थानिक विकास समिती यांचे खास करून अभिनंदन करीत आहे.

अशा रितीने हे महाविद्यालय आदरणीय व शिस्तप्रिय प्राचार्य डॉ.एल.डी.कदमसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये उत्तुंग भरारी घेत आहे. मी आपणा सर्वांना असा विश्वास देतो की, हे महाविद्यालय पुढील नॅक प्रक्रियत $A^{++}$ मध्ये असेल व ते ग्रामीण भागातील एकमेव नामांकित महाविद्यालय असेल असा विश्वास व्यक्त करून मी माझा शैक्षणिक अहवाल पूर्ण करतो.

जय हिंद!  जय कर्मवीर!

कार्याध्यक्ष - प्रा.डॉ.व्ही. बी.पाटील